स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 07–07–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 11. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 12. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 13. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 2. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 3. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. रंजना लाडे, उपायुक्त (1)
2. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 87ः– {हॉटमिक्स प्लॉन्ट} महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाद्वारे नागपूर शहरातील रस्त्याची दूरुस्ती व सूस्थीतीच्या कामासाठी लेबर पुरवठा करण्याकरीता रु.9236800/–राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व

तदनंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 88</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. ३६ मधील भांडेवाडी डम्पींग वार्डला संरक्षण भिंतीचे बांधकामकरिता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. वी. एफ. डंढारे यांची १२.६७ टक्के कमी दराची रु. ३९,०१,२४३/— रक्कमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर काम महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी विशेष शासकीय निधीमधुन आर्थिक वर्ष २०१६—२०१७ मध्ये रु. ४४,६७,२४३/— राशीची तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 89</u>:— {लोककर्म झोन 02} "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत प्रभाग क्र. ५४, सुदामनगरी येथे टेकडीला रिटेनिंग वॉल (सुरक्षा भिंत) बांधकामास्तव प्राप्त एकूण ०३ अर्हताप्राप्त निविदांपैकी मे. एन. एन.बेलखुडे, यांची प्राकलनीय दरापेक्षा १ टक्का कमी दराची सुधारित रू. २,३७,६१,१७७/—रकमेची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 90</u>:— {शहर अभियंता} नागपूर शहरा मधील सिमेंट कॉक्रिट रस्ते प्रकल्प टप्पा—२ अंतर्गत पॅकेज—१५ मधील (१) अग्याराम देवी चौक ते देवरस बिल्डींग विदर्भ प्रिमीअर जवळ (२) माऊंट रोड तहसील कार्यालय ते एन.के.पी.साळवे पुतळा (३) लाल इमली चौक ते टांगा स्टॅन्ड (४) कोतवाली चौक ते गंगाबाई घाट पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्त्याचा विकास करण्यास्तव प्राप्त मे. एम. आर. ढोबळे, यांची प्राकलनीय दरापेक्षा २.५१ टक्के कमी दराची रू. १३,३२,७६,२५०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्या श्रीमती अंसारी सैय्यदा बेगम मो. निजामुद्दीन यांनी विरोध दर्शविला.)

<u>ठराव क्रमांक 91</u>:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ६१ येथील कल्पना गृहनिर्माण सोसायटी स्मृती नगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी श्री. गणेश लॅन्ड डेव्हलपर्स अॅन्ड कंस्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.२७ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४९,८५,६८४/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 92</u>:— {लोककर्म झोन 04} महानगरपालीका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र. 22 ब पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील सदर भागामध्ये सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव एकुण 03 अर्हता प्राप्त निविदांपैकी मे. सी. विजय नायडु हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.79 टक्के कमी दराची रूपये 63,91,575/—(रूपये त्रेसष्ट लक्ष ऐक्यानऊ हजार पाचशे पंच्यात्तर रूपये फक्त ) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 93</u>:— प्रभाग क्र. ६१ येथील सिमेंट गोडाउन भास्कर वाडेकर {लोककर्म झोन 05} नगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी श्री. जगदंबा कंस्ट्रक्शन कंपनी कोराडी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३५,७३,९३३,४३/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा राशी रु. ३५,७३,९३३,४३/— ऐवजी रु. ३५,७३,९३३.४३ या दुरुस्तीसह विषयास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्या श्रीमती अंसारी सैय्यदा बेगम मो. निजामुद्दीन यांनी विरोध दर्शविला.)

<u>ठराव क्रमांक 94</u>:— प्रभाग क्र. ६७, मानेवाडा एकमत नगर येथे संरक्षण भींतीचे {लोककर्म झोन 03} बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. राजेश रंगारी यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १८.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २८,३२,५६३/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 95</u>:— प्रभाग क्र. ६१ येथील सर्वश्री नगर रस्त्याचे डांबरीकरण {लोककर्म झोन 05} करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी श्री. जगदंबा कंस्ट्रक्शन कंपनी कोराडी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३८,३६,००९,८३/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा राशी रु. ३८,३६,००९,८३/— ऐवजी रु. ३८,३६,००९.८३/— या दुरुस्तीसह विषयास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्या श्रीमती अंसारी सैय्यदा बेगम मो. निजामुद्दीन यांनी विरोध दर्शविला.)

<u>ठराव क्रमांक 96</u>:— प्रभाग क्र. ६१ येथील संक्लप गृहनिर्माण सोसायटी किर्ती {लोककर्म झोन 05} नगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी श्री. जगदंबा कंस्ट्रक्शन कंपनी कोराडी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ६७,४३,९५२,७६/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा राशी रु. ६७,४३,९५२,७६/— ऐवजी रु. ६७,४३,९५२.७६ या दुरुस्तीसह विषयास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्या श्रीमती अंसारी सैय्यदा बेगम मो. निजामुद्दीन यांनी विरोध दर्शविला.)

<u>ठराव क्रमांक 97</u>:— केंन्द्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दि. ५ जून {आरोग्य विभाग} २०१७ म्हणजे 'जागतिक पर्यावरण' दिनाचे औचित्य साधून त्या दिवसापासून कचरा निर्तीतीच्याच ठिकाणी निर्मात्यांनी ओला—सुका असा वर्गीकृत करुन साठवणे व मनपा यंत्रणेस वर्गीकृत स्वरुपातच सुपूर्द करणे, मनपाने वर्गीकृत स्वरुपातच वाहतूक करणे व पुढील प्रक्रीया करण्यावर भर देण्यात येणार आहे. शासनाच्या 'अमृत' योजनेच्या लाभार्थी अशा ४०४१ शहरात हे अभियान सुरु होणार आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत कचरा निर्माण होणा—या ठिकाणीच तो

ओला व सुका असा वर्गीकृत करण्याची तरतूद असल्यामुळे हे अभियान हाती घेण्यात येत आहे.

ओला—सुका वर्गीकृत कचरा ठेवण्यासाठी अनुक्रमे हिरव्या व निळया रंगाचा डस्टबीन वापरावा, जर नागरीक असे बिन विकत घेऊ शकत नसतील तर संबंधीत मनपाने ते पुरवावेत असे शासनाने सुचविले आहे. शासनाने अशा बिन्सची मानके व किमती ठरवून दिल्या आहेत. शासनाशी दर करारात असलेल्या पुरवठादारांकडून हे बिन्स संबंधित नागरीसंस्था घेऊ शकते अथवा त्या मानकानुसार बाजारातून विहीत पध्दतीने खरेदी करु शकते. याबाबत दि. ०८/०५/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेने खालील प्रमाणे ठराव क्रं. २६ पारीत केला आहे.

उपरोक्त प्रस्ताव सभागृहाने विचारात घेवून संपुर्ण शहरातील रहीवासी घरांना दोन डस्टबिन निशुल्क देण्यात यावे. त्याचप्रमाणे आर्थिक दृष्टया सक्षम नागरीकांनी स्वत:च्या पैशाने या डस्टबिन विकत घेण्याकरीता त्यांना आवाहन करण्यात यावे. आणि तशी व्यवस्था प्रशासनाने निर्माण करावी. तसेच शहरातील अनिवासी वापराकरीता लहान मोठया व्यवसायीकांना/प्रतिष्ठित संस्था/कंपन्या यांना सशुल्क वितरीत कराव्यात आणि शहरातील खासदार, आमदार आणि नगरसेवकांनी या डस्टबिनच्या खरेदी करीता आणि वितरणाकरीता आपल्या स्वेच्छा निधीतून हया करीता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दयावा आणि शहरातील प्रतिष्ठित संस्था/कंपन्या/व्यवसायीक प्रतिष्ठाणे यांनी त्यांच्या सीएसआर निधीतून उपलब्ध होण्याकरीता प्रशासनाच्या वतीने आवाहान करण्यात यावे. रहीवासी घरांना दयावयाच्या डस्टबिनची आवश्यकतेनुसार डीजीएस ॲण्ड डी दरानुसार खरेदी करण्यासाठी प्रशासनाने प्रथमता संस्था निश्चित करुन त्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीने विना निविदा खरेदी कराव्यात व त्यासाठी सन २०१७—१८ च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी. मा. सत्तापक्ष नेता श्री. संदिप जोशी यांनी केलेल्या सुचनेस हा ठराव मंजुर करण्यात येतो, या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूर आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

आर्थिक दृष्टया कमकुवत ज्या नागरीकांना मनपा कडून मोफत बिन्स पाहीजे आहेत त्यांचेसाठी www.nmcnagpur.gov.in हया नागपूर मनपाच्या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन मागणी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. अशा नागरीकांनी दि. ३०/०६/२०१७ पर्यंत आपली मागणी नोंदवावी ज्यांना घरुन अशी मागणी नोंदवता येणे शक्य नाही त्यांनी सायबर कॅफे अथवा मनपाचे क्षेत्रीय कार्यालयातून मनपा कर्मचा—यांचे मदतीने मागणी नोंदवता येईल. अशी व्यवस्था करण्यात येत आहे.

अशी मागणी प्राप्त झाल्यावरच नेमक्या किती बिन्सची खरेदी करावयाची हे समजु शकेल. तथापि ती खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे शासनाशी DGS&D दर करारावर उपलब्ध पुरवठादारांकडून खरेदी करणे म्हणजे तांत्रिक दृष्टया बिना निविदा स्वरुपाची खरेदी ठरत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि ड प्रकरण ५ मधील कलम २ व उपकलम २ नुसार यासाठी सक्षम प्राधीकरण असलेल्या स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. सबब DGS&D दरकरारातील दरांनुसार शासनाशी दरकरारात नमुद पुरवठादारांकडून डस्टबिन्स खरेदीचा प्रस्ताव विचारात घेऊन आरोग्य विभागास विचारणा केली असता किती कचरा कुंडीच्या जोडया घ्यावयास पाहिजे त्यावर विभागाने एकूण ५.५० लक्ष जोडया घ्यावयास पाहिजे अशी सुचना केली. आता पर्यंत किती कचरा कुंडया विभागाद्वारे खरेदी करण्यात आल्या यावर विभागाने दहा हजार जोडया घेण्यात आल्या व त्यापैकी ७२८८ जोडयांचे वाटप करण्यात आले आहे असे स्पष्ट केले. कचरा कुंडयांच्या एकूण ५.५० लक्ष जोडया घ्यावयाच्या आहे असे विभागाने सुचित केल्यामुळे परंतू ३१ जुलै पर्यंत कचऱ्याचे वर्गीकरण करावयाचे असल्यामुळे प्रथम टप्प्यात एकूण २,७५,०००

लक्ष कचरा कुंडया (जोडया) घेण्यात याव्या व उर्वरित कचरा कुंडया (जोडया) दुसऱ्या टप्प्यात आवश्यकतेनुसार घेण्याचे अधिकार आयुक्त, म.न.पा. यांना देण्यात येते.

तसेच या खरेदीची एकूण अंदाजे राशी रु. १३.५० कोटी आहे असे विभागाचे अभिमत आहे. त्यामुळे या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येते. आणखी असे की ही खरेदी विभागाने कचरा कुंडयांचा दर्जा उत्तम व उत्कृष्ट असावा म्हणून यापुर्वी ज्या नामांकित कंपनी कडून विभागाने खरेदी केली आहे. त्यांचे कडून करण्यात यावी व ते दर DGS & D/GeM दरकरारातील नोंदणीकृत दर असावे याची प्रशासनाने काळजी घ्यावी वरील सूचनेसह अनुसूचित प्रकरण ५ मधील कलम २ व उपकलम २ नुसार या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 98:— प्रभाग क्र. ६१ येथील टेलिफोन नगर भाग १ रस्त्याचे {लोककर्म झोन 05} डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी श्री. गणेश लॅन्ड डेव्हलपर्स ॲन्ड कंस्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४१,४५,१५५./— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 99:— नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील नारी येथे, पाटणकर चौक ते {लोककर्म झोन 09} सहयोग नगर रस्त्याचे सिंमेट कॉक्रीटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 99,99,995/— पेक्षा 13.10 टक्के कमी दराची रू. 86,89,996/—(रूपये छयान्शी लक्ष ऐकोणन्नव्वद हजार नऊशे छान्नव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 100:— प्रभाग क्र. ६१ येथील खामले लेआउट सर्वश्री नगर {लोककर्म झोन 05} रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आलेली असता अर्हता प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी श्री. जगदंबा कंस्ट्रक्शन कंपनी कोराडी यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३२,०४,२१६,१७/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा राशी रु. ३२,०४,२१६,१७/— ऐवजी रु. ३२,०४,२१६.१७/— या दुरुस्तीसह विषयास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 101:— शासकीय अनुदाना अंतर्गत नागपूर नरसाळा—हुडकेश्वर {लोककर्म झोन 03} क्षेत्रात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत मौजा—नरसाळा माऊलीनगर व दिघोरी (सर्वश्रीनगर) जोडणाऱ्या नाल्यावर पुलाचे संरक्षण भिंत व अप्रोच रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. विश्वदीप ईन्टरप्रायजेस यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १०.०१ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ६७,५८,२८९/— रकमेची प्राप्त असल्यामुळे त्यांची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 102ः— प्रभाग क्र. ४४ येथे लिटिल रोज कॉन्व्हेन्ट ते राजेंद्र नगर
{लोककर्म झोन 05} चौक ते नागनदी पर्यंत स्ट्राम वाटर ड्रेनचे कामास्तव रू. ९४७१३९९/— रकमेच्या प्राकलनास मंजुरी प्रदान करणे तसेच या कामाचे निविदाकार में. सी.विजय नायडु यांचे मंजुर दराने काम करून घेण्यास रू. ३४८१५४/— रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 103ः— प्रभाग क्र. ६७ मानेवाडा रोड ते अलंकार नगर येथे
{लोककर्म झोन 03} मुख्य गडर लाईन टाकण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी **मे. एन. एन. बेलखुडे व मे. आर. बी. यादव** यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ०.९९९९ टक्के कमी दराची दोन्ही निविदाकार यांना समप्रमाणात राशी **रू. ३७,१२,३५७/—** रकमेचे प्रत्येकी प्रथम निम्नत्तम निविदा असल्यामुळे एकूण राशी **रू.** ७४,२४,७१४/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 104ः— Providing technical assistance for creation of a
{कर व कर आकारणी विभाग} comprehensive computerized geo- enabled property database for Nagpur Municipal Corporation (NMC) to support assessment and consolidation of all Municipal Revenues. च्या कामातील PART B अंतर्गत सूरू असलेल्या कामाच्या दराबाबत, अपेक्षीत वाढीव खर्चाबाबत व कामाच्या प्रगतीबाबत प्रश्न विचारात घेऊन उचित निर्णय घेणेबाबत.

ठरावांकीत काम मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड ला खालील प्रकारे सर्व्हेचे काम देण्यात आले व ते कामे दोन भागात विभागलेले आहे.

**1) PART A**

Design & implementation of Assessment & consolidation of Municipal Revenues Application (including all interfaces & integration).

**2) PART B**

Door to Door Property survey and GIS updation/mapping/linking and seamless integration of the same with e-governance software of NMC.

PART 'B' अंतर्गत करावयाच्या कामाकरीता RFP दस्ताऐवजातील Annexure –II Financial Bid Form अन्वये cost of services per Property/building unit करीता इच्छूक ऐजेन्सीनी दर quote करावयाचे होते व त्यानुसार successful Bidder M/s. Cybertech systems & Software Ltd द्वारा Rs.120/Building unit दर quote केल्याचे दिसून येते. उक्त दर निम्नत्तम असल्यामुळे संबंधीतांस उक्त काम स्थायी समीती ठराव क्र. १६२ दिनांक १०/०९/२०१७ च्या मंजूरीन्वये कार्यादेश क्र. 211/AD/2015 दिनांक ०६.११.२०१७ अन्वये देण्यात आले.

स्थायी समीती, म.न.पा. द्वारा ठराव क्र.१६२ दि.१०/०९/२०१७ अन्वये मंजूरी प्रदान करतांना Item B च्या कामाकरीता दर **रू.१२०/- प्रति हाऊस** विचारात घेतलेला आहे व RFP दस्ताऐवजातील Annexure –II Financial Bid Form अंतर्गत प्रती building unit असा दर

मागविण्यात आलेला होता, तसेच तत्कालीन कर निर्धारक द्वारा letter of intimation अन्वये कळविण्यात आलेला **दर सुध्दा रू.१२०/- प्रति हाऊस युनीट असा आहे.**

युनीट म्हणजे इमारत किंवा इमारतीचा भाग, जे स्वतंत्रपणे भाड्याने देण्यायोग्य असेल, एका कुटुंबाच्या वापरातील घर किंवा घराचा भाग, एक स्वतंत्र युनीट समजण्यात येते. एखाद्या इमारतीत कुटुंबातील व्यक्ती वेगवेगळ्या राहत असतील व त्यांची स्वयंपाक करण्याची व्यवस्था वेगळी असेल तर अशा प्रत्येक भागाला एक स्वतंत्र युनीट समजून त्याची वेगवेगळी कर आकारणी करण्यात येते. तसेच एखाद्या घराचा काही भाग निवासी व काही भाग अनिवासी वापरात असेल तर अशा बाबतीत निवासी व अनिवासी भाग दोन वेगळे युनीट समजून त्याची कर आकारणी वेगवेगळी करण्यात येते. फ्लॅट स्कीममधील प्रत्येक गाळ्यांना वेगळे युनीट समजून त्याप्रमाणे वेगवेगळी कर आकारणी करण्यात येते.

संबंधीत कामाच्या RFP दस्ताऐवजातील बाब क्र.३.२ अंतर्गत Scope of work प्रमाणे Individual tenemats/House unit in building करीता data collect करणे अपेक्षीत आहे. तसेच RFP दस्ताऐवजातील Annexure –II Financial Bid Form अन्वये सुद्धा प्रति building unit असा दर इच्छुक एजेन्सीनी quote करणे अपेक्षीत होते. त्यामुळे मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड द्वारा **प्रति हाऊस युनीट रू.१२०/- दराने** केलेली मागणी जरी योग्य असेल परंतू स्थायी समीती ठराव क्र. १६२ दि.१०/०९/२०१५ अन्वये **रू.१२०/- प्रति हाऊस** मंजूर आहे. प्रति युनीट दर रू. १२०/- अन्वये मे. सायबरटेक सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमीटेड ला भुगतान करावयाचे झाल्यास उक्त कामाच्या **PART 'B'** करीता मंजूर खर्च रू. ७,२०,००,०००/- मध्ये वाढ होवू शकते. निविदातील अटी व शर्ती तसेच आर. एफ.टी. दस्ताऐवजातील दर रू. १२०/- प्रती हाऊस युनीट असा आहे. परंतू स्थायी समितीकडे ठरावाच्या प्रारूपात मुद्रण चुक झाल्यामुळे ठराव क्र. १६२ दिनांक १०.०९.२०१५ हा मंजूर झालेला आहे. म्हणून रू. १२०/-प्रती हाऊस युनीट या दरास मुद्रणास झालेल्या दुरूस्ती करण्यास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावित प्रकल्पाकरिता पी.एम.सी. ची नियुक्ती केली होती काय ? होय परंतू निविदाकाराने करारनामा करण्यापूर्वी नकार दिल्यामुळे पी.एम.सी. ची नियुक्ती झाली नाही. असे विभागाद्वारे मत नोंदविण्यात आले. सध्यास्थितीत पी.एम.सी. चे काम कोण करीत आहे यावर विभागाने आपले मत स्पष्ट करतांना असे सांगितले की, विभागाद्वारे करण्यात येते आहे. एकूण किती हाऊस युनिटचे सर्वेक्षण झाले आहे. २,६३,५८२ लक्ष युनिटचे सर्वेक्षण झाले आहे. असे विभागाने स्पष्ट केले. त्यापैकी किती हाऊस युनिटला विभागाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली. १,०९,९६५ युनिटला विभागाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रलंबित प्रकरणांची संख्या जास्त आहे यावर स्थायी समितीने तिव्र नाराजी व्यक्त केली व विभागाकडे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा तातडीने करण्याचे निर्देश दिले. निवडणुकीच्या काळात सर्वेक्षणाचे कामे बंद होते काय ? अशी स्थायी समितीने विचारणा केली असता विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले की, काम संथ गतीने सुरु होते. तसेच या काळात विभागाद्वारे सर्वेक्षणामार्फत प्राप्त झालेल्या हाऊस युनिटच्या प्रकरणात मान्यता दिली आहे काय? यावर प्रशासनाने असे स्पष्ट केले की, या दरम्यान जास्तीत जास्त महसूली अधिकारी व कर्मचारी निवडणूकीच्या कामामध्ये असल्यामुळे हे काम पाहिजे त्या प्रमाणात होवू शकले नाही. किती कालावधी यामध्ये गेला असे स्थायी समितीने विचारल्यावर

प्रशासनाने दोन महिन्याचा कालावधी या निवडणूक प्रक्रियेदरम्यान गेला. असे स्पष्ट केले. संविदाकाराने सर्वेक्षणाचे पहिले देयक विभागाकडे केव्हा सादर केले. दि. २८/११/२०१६ ला पहिले देयक सादर केले. असे मत विभागाने व्यक्त केले. ठराव क्र. १६२ दि. १०/०९/२०१५ मध्ये झालेली मुद्रण चुक ही त्याच वेळी लक्षात का आली नाही व हा प्रस्ताव एवढया उशिरा दुरुस्ती करिता का पाठविला असा प्रश्न स्थायी समितीने उपस्थित केला. त्यावर विभाग स्पष्टता करु शकला नाही. ही बाब त्याच वेळी लक्षात आली असती तर सर्वेक्षणाचे कामे व विभागाने हाऊस युनिटला मान्यता देण्याचे प्रमाणाला गती प्राप्त झाली असती. असे या स्थायी समितीचे मत झाले आहे.

त्यामुळे विभागाद्धारे सादर केलेला उपरोक्त विषय विचारात घेवून रु. १२०/- प्रती हाऊस युनिट या दरात मुद्रणात झालेल्या दुरुस्ती करण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत सर्वेक्षणाचे काम संविदाकारास पूर्ण करावयाचे होते परंतू विभागाद्धारे वरील जी कारणमिमांसा झाली त्यामुळे व दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत उपरोक्त काम पूर्ण होण्याची साशंकता असल्याचे विभागाने विषयात स्पष्ट केले आहे. या कारणामुळे हे काम दि. ३० डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात येते. परंतू आणखी असे की, या मुदतवाढी नंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. याची विभागाने नोंद घ्यावी. संविदाकाराने दिलेल्या हाऊस युनिटच्या सर्वेक्षणाचा अहवाल विभागास सादर केल्यावर, प्रत्येक आठवडयात हाऊस युनिट मंजूर करण्याचे काम विभागास अनिवार्य राहील याचा संपूर्ण अहवाल प्रत्येक १५ दिवसाचे आत स्थायी समितीच्या पटलावर ठेवणे विभागास बंधनकारक राहील.

निर्धारीत केलेल्या हाऊस युनिटच्या व्यतिरीक्त अधिकच्या हाऊस युनिटच्या सर्वे करिता रु. १२०/- प्रती हाऊस युनिट हा दर लागू राहील. परंतू आणखी असे की, महसूली उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे यादृष्टीने कर आकारणीत नसलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षणाचे काम सुध्दा एकाचवेळी सुरु करावे असे ही स्थायी समिती निर्देश देते.

श्री.मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, ओ.सी.डब्लु. च्या संदर्भात सोक्षमोक्ष लावण्यात यावा.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.सभापती महोदय, कन्हान मधुन पाणी सप्लाय होत आहे, काही ठिकाणी विद्युत दिव्यांचे तार उघडे आहे, हवामान खराब राहिल्यास तारे तुंटतात, झाडे पडते यामुळे विद्युत पुरवठा खंडीत होतो, याकरिता संबंधित विभागाकडुन माहिती घेणे आवश्यक आहे.

सभापती :– मा.सदस्यगण, या संदर्भात 12 तारखेला ओ.सी.डब्लु. आणि इलेक्ट्रीक विभागाची बैठक घेण्यात येइल. त्या बैठकीत सर्व कामाचा आढावा घेवून संबंधितांना तसे निर्देश देण्यांत येईल.

श्रीमती जयश्री वाडीभस्मे :– मा.सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानांर्गत जे शाळेमध्ये केअरटेकरची नियुक्ती करण्यांत आली आहे. त्यांना पगार का मिळाला नाही.

उपायुक्त (श्रीमती लाडे) :– मा.सभापती महोदय, विशेष शिक्षकांकरिता यामध्ये गर्व्हमेंटचे नॉर्म्स आहे त्याची तपासणी करून कार्यवाही करण्यांत येईल.

श्रीमती सविता कावरे :– मा.सभापती महोदय, संजय नगर स्कुल मे ऑटो मोबाईल सेंटर शुरु किया गया है वहा पर 2 से 3 महिनों से काम बंद है उसके बारे मे 40 बच्चे मेरे

घर आये थे वह 10 वी क्लास के बच्चे है, आनेवाले समय मे उन बच्चो के प्रॅक्टीकल शुरू होनेवाले है, अगर वह सेंटर शुरू नही हुआ तो उनको तकलीफ होंगी।

उपायुक्त (श्रीमती लाडे) :– मा.सभापती, स्थायी समिती, मैं जानकारी लेकर मा.सदस्या को बताती हुॅं।

ठराव क्रमांक 105 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| अति. उपायुक्त<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |